पोषण बाग : कोविड पश्चात परिस्थितीत एक आश्वासक हस्तक्षेप लक्ष्मी उन्नीथन

Lakshmi Unnithan

आज जग हे अकल्पित कोरोना व्हायरसच्या विनाशकारी परिणामाचा सामना करीत आहे. कोरोनाच्या संसर्गामुळे होणाऱ्या थेट परिणामांबरोबरच रोजगाराचे मोठ्या प्रमाणात नुकसान, बेरोजगार, उपासमार आणि नागरिकांच्या एकूण आरोग्याच्या स्थितीत होणारी हानी इतर अनेक प्रश्नांचा सामना बहुतेक राष्ट्रांना करावा लागत आहे.

टाळेबंदीच्या काळात सरकारने शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी काही उपाययोजना जाहीर केल्या असल्या तरीसुद्धा टाळेबंदीचा कृषी अर्थव्यवस्थेवर हानिकारक परिणाम झालेला आहे. तथापि अन्न पुरवठा साखळीच्या विघटनामुळे देशभरातील शेतकऱ्यांवर लक्षणीय परिणाम झाला आहे. या परिस्थितीचा लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आघात/धक्का सहन करण्यास भाग पडत आहे. कामगारांची कमतरता, वाहतूक आणि बाजारातील मर्यादित कामे या सह अनेक कारणांमुळे शेतकरी नाशवंत वस्तूंचे पीक आणि व्यापार करण्यासाठी संघर्ष करीत आहेत.

हवामानाचा अत्याधिक लहरीपणा, पाण्याचा ताण, जमिनीचा ऱ्हास इ. महत्त्वाची कृषी व्यवसायात आव्हाने देखील असतात. ज्यामुळे भविष्यात अन्न पुरवठ्याचा धोका उद्भवतो. हे आपण कोविड (साथीच्या रोगाचा) काळात विसरलो आहोत. कृषी उत्पादनाच्या वैविधीकरणामुळे या पर्यावरणीय आाव्हानांना सामोरे जाण्यास तसेच कॅलरीयुक्त ते 'पोषण समृद्ध' अन्नप्रणाली या अवस्थेपर्यंत पोहचण्यास मदत होते. तसेच शाश्वत अन्न मूल्य साखळी विकसित केल्याने अन्नप्रणालीचे परिवर्तन होऊ शकते.

लॉकडाउन मध्ये आपण फक्त स्वच्छ आणि पौष्टिक अन्न कसे मिळवायचे याचा विचार केला. चरबीयुक्त बर्गर आणि पास्ता असल्या पदार्थांपासून पूर्णपणे दूर राहण्याच्या दृष्टीने आपण बरेच काही केले आहे. एक वेळ असा होता की आपण घराच्या मागील अंगणात घेतले जाणारे पीक अन्न म्हणून खायचो आणि केरळमध्ये अजूनही आपल्या घरामागे अंगण आहे. आताच्या काळात स्थानिक गोष्टींना आधुनिकतेचा शिक्का देण्यात आला आणि अगदी सुपर मार्केटमध्ये सुद्धा ते उपलब्ध असल्याने स्थानिकतेची कल्पना ही एक नावीन्यता झालेली आहे.

देशभरात पौष्टिक बागांना प्रोत्साहित करण्यासाठी बऱ्याच हालचाली सुरू आहेत. त्यामध्ये स्थानिक भाज्या सुद्धा समाविष्ट करणे



वाडी उपक्रमांतर्गत परस बागेतून पोषक भाजीपाला घेताना महिला

आवश्यक आहे. कारण त्या निश्चितच पोषण आणि आरोग्य, समुदाय, संस्कृती आणि पर्यावरण सुधारण्यास पोषक ठरतात. छत्तीसगड सरकारने स्थानिक भाज्यांचे महत्त्व ओळखून त्यास त्यांच्या लक्षीत कार्यक्रमातील एक महत्त्वाचा विषय म्हणून वाडी (परसबाग) NGGB (Narwa Garu-a Ghurua Badi) विकासाला महत्त्व देवून त्यासाठी सरकारद्वारा मार्गदर्शक तत्त्वे प्रसारित करून त्या दिशेने कार्य सुरू केलेले आहे. घराच्या मागील अंगणात परसबाग विकसित करण्यासाठी सरकारी प्रोत्साहन असले तरी देखील हवामान आणि या साथीच्या आजाराच्या आव्हानात्मक परिस्थितीत सुद्धा अन्नसुरक्षा आणि पोषण आकाराच्या दिशेने बदल घडवून आणले पाहिजेत.

प्रदान (अर्पण भट्टाचार्य आणि अजय गुप्ता, कृषी जग, जून २०२०) च्या अहवालानुसार छत्तीसगड, बस्तर येथील अल्पभूधारक शेतकरी सोमी बघेल हे त्यांच्या वाडीचा विकास करण्याच्या निर्णयाची एक प्रेरणादायक कहाणी सांगतात की, वाडी विकसित करणे आणि शेतीची नवीन तंत्रे शिकणे ज्यायोगे त्यांना चांगले उत्पन्न मिळेल त्यासाठी त्यांनी नाबार्ड, जिल्हा फलोत्पादन विभाग, मनरेगा आणि प्रदान संस्थेच्या अनेक कार्यक्रमांतर्गत सहभागी होऊन पाठिंबा मिळविला. शेतीच्या बदलत्या स्वरूपानुसार पौष्टिक बाग उगवणे या दृष्टिकोणानुसार स्वयंपाकघरासाठी असणाऱ्या वाडी (परसबागेच्या) माध्यमातून

महिलांना सहभागी होण्यासाठी एक संधी उपलब्ध झाली. वाडी हे सर्व आदिवासी भागात नेहमीच आढळून येते. ज्यामध्ये मका, बाजरी पपई, मोरिंग्या, पौष्टिक स्थानिक भाजीपाला, लौकी इत्यादी हिरव्या पालेभाज्या व रोपांची लागवड केली जाते. त्या आधारे गरजेच्या वेळी त्यांना अन्न पुरवठा आणि रोख सुद्धा प्राप्त होते. वाडी हे ग्रामीण आदिवासी शेतकऱ्यांसाठी विशेषत: स्त्रियांसाठी एक अमूल्य संसाधन आहे. ग्रामीण भागातील लोकांच्या कल्याणासाठी ग्रामीण पार्श्वभूमीस अनुसरून अनेक संशोधने करण्यात आली आहेत. त्यातून सुद्धा या वाडी विकास कार्याला पाठबळच मिळाले आहे. कोविड-लॉकडाऊन पश्चात परिस्थितीत आपण बघतो की खाद्य पदार्थांच्या सुरक्षेसाठी वाडी परसबाग विकसित करण्यासाठी अशा कार्यक्रमांमध्ये नोंदणी करणाऱ्या महिलांच्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

कृष्णा मॅकेन्झी (सॉलिट्यूड कॅके, ऑरोविल, पांडिचेरी) यांनी पुढाकार घेऊन स्थानिक लोकांच्या खाद्य पदार्थांची म्हणून स्थानिक चळवळ सुरू केली. हा एक असा उपक्रम आहे ज्यात सर्व स्थानिक अन्न पदार्थ उपलब्ध असून त्याची मुबलक प्रमाणात वाढ करणे सहज सोपे आहे. आपणास फक्त रोपांना पाणी घालणे आणि त्यांची थोडी काळजी घेण्याची आवश्यकता असते. ते सहज वाढतात आणि पौष्टिकतेने परिपूर्ण सुद्धा असते. तसेच ते प्रत्येकांसाठी आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य पर्याय ठरतो. संपूर्ण समुदायातील लोकांनी जर जाणीवपूर्वक आठवड्यातून काही वेळा ही स्थानिक उपज ग्रहण केली तर पौष्टिक पालक, विविध फळे व पालेभाज्यांमधून जी विपुल प्रमाणातील पौष्टिकत्व प्राप्त होते तेच सकस पौष्टिकत्व स्थानिक भाज्यांमधून सुद्धा प्राप्त केली जाऊ शकते. यातून आपल्या जाणिवांमध्ये एक प्रदीर्घ बदल होईल आणि आपण आपल्या धरणी मातेशी व पौष्टिक गरजांच्या संबंधांचा पुन्हा दावा करू. कोविड परिस्थितीत समुदायात एकत्रित भाज्या प्राप्त करण्यास पसंती करणाऱ्या लोकांची संख्या वाढली आहे.

गुजरातमधील उत्थान ही संस्था ज्या ज्या समुदायांमध्ये काम करीत आहे त्यांच्याशी सतत संपर्क साधत होती आणि त्यांच्या असे लक्षात आले की कोविड काळात बऱ्याच गावांमध्ये भाजीपाला किंवा भाज्यांचे दर्जेदार टिकाऊ बियाणे वा वाण सहज उपलब्ध नव्हते. लोकांकडे रोख रक्कम उपलब्धीच्या अडचणी निर्माण झाल्याने बहुतेक कुटुंबे भाजी खरेदीला प्राधान्य देत नाहीत. त्यामध्ये सर्वात जास्त पीडित महिला आणि मुले असतील. कारण कुटुंबातील पितृसत्ताक पद्धतींमुळे इतरांना प्राधान्य दिले जाते. तसेच बऱ्याच भूमिहीन कुटुंबांना भाजीपाला पिकविण्याचा पर्यायही नाही.

उत्थान संस्थेमार्फत ५३ गावातील २५१४ कुटुंबांना किचन गार्डन किट्स देण्यात आल्या. किनारी भागातील ८६४ आणि आदिवासी भागातील १६५० कुटुंबांना स्थानिक पातळीवर संशोधन करून त्यात भेंडी, सोयाबीन, वटाणे, दुधी भोपळा, कारले, लौकी, दोडकी इत्यादी सहा प्रकारचे बियाणांचे वितरण करण्यात आले होते. बियाणे किटा या सुमारे १०००-१५०० चौरस फुटांसाठी उपयुक्त होत्या. या उपक्रमात निश्चित केलेले भूभाग हे लोकांच्या घरांच्या आसपासच होते. जैव खताच्या गरजेची काळजी महिलांचे गट आणि शाश्वत शेती महिला प्रशिक्षकांनी एकत्रितरित्या घेतली. कोविड प्रभावाच्या संदर्भाने घ्यावयाच्या सुरक्षा व काळजी संदर्भात सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांनुसार मुखपट्ट्या, हातमोजे इत्यादींचा वापरकरून ग्रामीण स्वयंसेवकांनी आणि चमूने शारीरिक अंतर निश्चितीची काळजी घेवून बियाणांचे वितरण केले. यामध्ये ग्राम पंचायती व ग्रामीण नेत्यांना सुद्धा चांगल्या परिणामासह सहभागी करून घेतले होते. परस बागा चांगल्या पद्धतीने सुनिश्चित करण्यासाठी पत्रके, डिजिटल जागरुकता, महिला प्रशिक्षकांकडून चिरंतन शेती पद्धतीचे व्हिडीओ आणि जैव कीटकनाशक उत्पादनांचा समावेश इत्यादी पूरक प्रयत्न सुद्धा करण्यात आले.

या महामारी संकटाच्या काळात मदत करण्यासाठी आवश्यक असलेल्या चेतना निर्माण करण्याच्या प्रयत्नांमुळे विशेषत: २५१४ कुटुंबांनी इतर कुटुंबे जे भूमिहीन आहेत. ज्यांच्याकडे जमीन किंवा पाण्याचे स्त्रोत नसल्यामुळे भाजीपाला पिकविण्यास असमर्थ आहेत अशा ७५०० कुटुंबांना आधार देण्याची वचनबद्धता दर्शविली. जुलै ते सप्टेंबर २०२० दरम्यान या अडीच महिन्यांसाठी प्रत्येक कुटुंबात सरासरी सहा सदस्य या अंदाजाने दिवसाला ७०० ग्रॅम भाजीपाल्याच्या पुरवठा करण्यातून ७५०० कुटुंबांना पोषण सुरक्षा सहाय्य केल्या गेले.
या काळात पोषण सुरक्षा या सारख्या चळवळी अधिक व्हायला हव्यात. परसबागेत विविध स्थानिक पौष्टिक भाजीपाल्याच्या उत्पादनातून पोषण वाढविण्याचे महत्त्व आपल्याला समजते. आव्हानात्मक परिस्थितीत महिला आणि मुलांच्या स्वास्थ्याला सर्वात जास्त महत्त्व दिले जाणे आवश्यक आहे. आपल्याला प्रतिकारशक्ती मिळवून देण्यासाठी स्थानिक फळ आणि भाजीपाल्यापेक्षा इतर कोणतेही आयात केलेली भाजीपाला किंवा फळे महत्त्वाची नसतात. या चळवळीसाठी निश्चितच अशा समविचारी शेतकऱ्यांची गरज आहे. जे आपल्या सांस्कृतिक शेतीच्या वारशाचे मूल्यमापन करण्यास आणि नवे शोध घ्यायला तयार असतील. तसेच त्यांच्या बरोबरच समुदायाला सुद्धा सन्मानपूर्वक आर्थिक तसेच इतर मदत होईल.

Lakshmi Unnithan
Editor - Agriculture World ,Head PR & Communication
Krishi Jagran, DSR Agri Media Pvt. Ltd. 60/9, 3rd Floor,
Yusuf Sarai Market, Near Green Park Metro Station,
New Delhi-11001
Email: dr.lakshmi@krishjagran.com

मराठी अनुवाद : प्रा. डॉ. केशव माणिक वाळके, स. प्रा. देविदास शंभरकर

Source : Nutrition gardens- A promising intervention in the post COVID scenario, LEISA India December, 2020.